MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र.१ जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा,
मुंबई ४०० ००५ **दूरध्वनी २२१६ ३९६४/२२१६ ३९६५**
**ई-मेल : mercindia@merc.gov.in**
**संकेत- स्थळ: www.merc.gov.in**

**जाहिरात क्र. ३९/२०२४-२५**

## जाहीर सूचना

**प्रारुप विनियमांवर अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागविण्याबाबत**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (मविनिआ किंवा आयोग) प्रारुप "मविनिआ (वीज मागणीची लवचिकता आणि वीज मागणी व्यवस्थापन- अंमलबजावणीची चौकट, खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण; आणि मूल्यांकन, परिमापन आणि पडताळणी) विनियम, २०२४" तयार केले आहेत.

२. हे प्रारुप विनियम त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

३. प्रारुप सुधारणा विनियमांवरील अभिप्राय, सूचना किंवा हरकती आयोगाच्या (**www.merc.gov.in / e-public-consultation)** संकेत-स्थळावरील **'E-public consultation'** या टॅबद्वारे या सूचनेच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत अपलोड करता येतील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास संबंधित व्यक्ती कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये सकाळी ०९.३० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान **मोबाईल क्र.८९२८०७१५२२** वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात. **'E-Public Consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५** या पत्त्यावर **दि. २० सप्टेंबर, २०२४** रोजी सायंकाळी ५.०० पूर्वी दाखल करावी. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

४. **दि.२० सप्टेंबर, २०२४ रोजी** किंवा त्याआधी अपलोड केलेले किंवा प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

**(डॉ. राजेंद्र ग. आंबेकर)**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

दिनांक : २७/०८/२०२४
ठिकाण : मुंबई